# MARATHI SUB-JUNIOR BOYS & GIRLS (STD. IV & V)

## शिव भावे जीव सेवा

जोवर कोट्यावधी लोक उपाशी आणि अशिक्षित राहतील तोवर त्यांच्याच पैशाने शिक्षण घेऊन त्यांच्याकडे जे ढुंकूनही पाहत नाहीत त्यांना मी कृतघ्न आणि द्रोही समजतो . आपल्या गरीब देशबांधवांना पिळून काढून , त्यांच्या पैशावर चैन करून , जे थाटामाटाने हिंडतात पण त्यांच्यासाठी काही करीत नाहीत त्यांना मी घृणास्पद समजतो .

प्रत्येक वस्तूचा पहिला वाटा गरिबांना मिळाला पाहिजे . आपला हक्क केवळ उरलेल्यावर आहे . प्रथम आवश्यक आहे विराटाची पूजा ---- आपल्या भोवताली असणाऱ्या सर्व जीवांची पूजा . त्या विराटाची पूजा करा . माणसे व पशू हे सर्व आपले देव आहेत , आणि ज्यांची आपण सर्वप्रथम पूजा करावी असे देव म्हणजे आपले देशबांधव .

सर्वांकडे , ते सारेजण ईश्वराची रूपे आहेत या दृष्टीने पाहा . इतकी तपश्चर्या करून मला हेच सत्य कळले की प्रत्येक जीवाच्या ठिकाणी भगवंताचा वास आहे . जीवांची सेवा हीच ईश्वराची सेवा .

देह-मन-वाणी ही जगाच्या हितासाठी अर्पण केली पाहिजेत . 'मातृदेवो भव , पितृदेवो भव ' असे आजवर तुम्ही वाचले , पण मी म्हणतो ---- 'दरिद्रदेवो भव , मूर्खदेवो भव '. दरिद्री , मूर्ख , अज्ञानी , दुखी , हेच तुमचे देव होवोत . त्यांची सेवा म्हणजेच परमधर्म ही गोष्ट जाणून असा .

MARATHI JUNIOR BOYS & GIRLS (STD. VI & VII )

# तुम्हीच तुमचे भाग्यविधाता !!!

जीवन ही एक अति कठोर वस्तुस्थिती आहे . ती कितीही दुर्भेद्य असली तरी आत्मा त्यापेक्षा अधिक शक्तिमान आहे . तुमच्या कर्मफलांची जबाबदारी वेदांत लहान-सहान देवी-देवतांवर लादत नाही . वेदांत घोषणा करतो की त्या सार्यान्साठी तुमचे तुम्हीच जबाबदार आहात . स्वतःच्या भल्या-बुर्या कर्माचेच बरे-वाईट परिणाम तुम्ही भोगत असतात .

जे दुसर्यान्ना दोष देत असतात ते दुबळ्या मनाचे कमनशिबी लोक असतात . स्वतःच्या चुकांनी त्यांनी ती दुर्दशा स्वतःवर ओढवून घेतलेली असते आणि मग ते इतरांना दोष देत बसतात , परंतु त्याने त्यांच्या अवस्थेत काहीच फरक पडत नाही . त्याने त्यांचा कसलाही फायदा होत नाही . उलट दुसऱ्यावर दोष लादण्याच्या या प्रयत्नांनी ते आणखीच दुबळे मात्र बनतात . म्हणून , स्वतःच्या दोषानसाठी दुसर्या कुणालाही बोल लावू नका . स्वतःच्या पायांवर उभे राहा आणि सर्व जबाबदारी स्वतःवर घ्या . म्हणा ...." जे हे दुःख मी भोगत आहे ते माझ्याच कृत्यांमुळे होय , आणि ह्यावरून हे सिद्ध होते की ते माझ्याकडूनच नष्ट होऊ शकेल . जे मी निर्माण केले आहे त्याचा मीच ध्वंस करू शकेन . "

म्हणून उठा , धीट बना , सगळी जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घ्या . जे बल वा जे साहाय्य तुम्हास हवे आहे ते तुमच्या आताच आहे . हे जाणून स्वतःच स्वतःचे भवितव्य घडवा . जे झाले ते होऊन गेले , त्याबद्दल खंत करीत बसू नका .

MARATHI SENIOR BOYS & GIRLS ( STD VIII & X )

# खरी देश - भक्ती

महान कार्य करावयाचे असेल तर त्यासाठी प्रथम हृदयाची तळमळ हवी . तुमच्या हृदयात तळमळ आहे काय ? कोट्यावधी लोक आज भुकेने तडफडत आहेत , नव्हे , शेकडोवर्षांपासून ते तसे तडफडत आहेत हे पाहून तुमच्या हृदयाला पीळ पडतो काय ? ..... त्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला आहात काय ? तुमची झोप उडाली आहे काय ? ही तीव्र भावना तुमच्या नसानसातून शिरून , तुमच्या रक्तात भिनली आहे काय ? तिने तुम्हाला अक्षरशः वेड लावले आहे काय ? देशाच्या दुर्दशेच्या या चिंतेने तुम्हाला पूर्णपणे ग्रासून टाकले आहे काय? या चिंतेने ग्रासल्यामुळे तुमचे नावलौकिक , तुमची पत्नी , तुमची मुले , तुमची संपत्ती , इतकेच नव्हे तर तुमचे स्वतःचे शरीर , या सार्यान्चा तुम्हाला विसर पडला आहे काय ? देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे . अगदी पहिलीच पायरी .

आपल्या देशबांधवांची दुर्दशा थांबविण्याकरिता तुम्ही काही प्रत्यक्ष मार्ग शोधून काढला आहे काय ? लोकांना शिव्याशाप देण्याऐवजी तुम्ही त्यांना खरोखर काही मदत करु शकता काय ? त्यांच्या दुःखात त्यांचे सांत्वन करण्याकरिता तुमच्याकडे गोड शब्द आहेत काय ? पण केवळ एवढेच पुरेसे नाही ..... पर्वतप्राय विघ्नांना तोंड देता येईल असा दृढनिश्चय तुमच्या ठाई आहे काय ?सर्व जग हाती खड्गा घेऊन तुमच्या विरुद्ध उभे झाले तरीही तुम्हाला जे सत्य वाटते ते करण्याचे धैर्य तुमच्यात आहे काय ? ........ अशा परिस्थितीत देखील तुम्ही आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करीत धीराने वाटचाल करीत राहाल काय ? तुमच्या ठायी अशी चिकाटी आहे काय? तुमच्या ठायी या सर्व गोष्टी असतील तर तुमच्यापैकी प्रत्येक जण अचाट कामे करील .